# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ०९ // रद्द स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक १५/०६/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.११/०३/२०१९ सोमवार रोजी दुपारी ०१.०० वाजता आयोजित स्थायी समितीची सभा लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता दि.१०/०३/२०१९ रोजी लागु झाल्याने सदरची सभा रद्द करण्यात आली होती. सदरची रद्द करण्यांत आलेली स्थायी समितीची सभा दि.१५/०६/२०१९ शनिवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती श्री.जितेंद्र भगवान मराठे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. श्री.जितेंद्र भगवान मराठे, सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| बालाणी भगतराम रावलमल | सनकत चेतन गणेश |
| ढेकळे सदाशिव गणपत | कापसे मयुर चंद्रकांत |
| बेंडाळे उज्वला मोहन | पाटील प्रतिभा सुधिर |
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | लढ्ढा नितीन बालमुकूंद |
| सोनवणे सुरेश माणिक | भंगाळे विष्णू रामदास |
| पोकळे दिलिप बबनराव | बरडे नितीन मनोहर |
| खडके सुनिल वामनराव | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |

सदर सभेस, मा.आयुक्त,डॉ.श्री.उदय टेकाळे मा.उपायुक्त,श्री.चंद्रकांत खोसे, श्री.लक्ष्मीकांत कहार, मुख्य लेखापरिक्षक, श्री. संतोष वाहुळे, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली.**

**मा.सभापती :-** नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** सभेला सुरुवात करणेत येत आहे. आजच्या सभेकरिता सन्मा.सदस्य श्री. कोल्हे प्रविण रामदास यांचा रजेचा अर्ज आलेला असुन तो मा.पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेला आहे.

**नगरसचिव:- विषय क्र. १)** दि.०५/०२/२०१९ व दि.२०/०२/२०१९ विशेष स्थायी समिती सभा तसेच दि.२६/०२/२०१९ तहकुब विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.९१पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे दि.०५/०२/२०१९ व दि.२०/०२/२०१९ विशेष स्थायी समिती सभा तसेच दि.२६/०२/२०१९ रोजी संपन्न झालेल्या तहकुब विशेष स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १५ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- कापसे मयुर चंद्रकांत**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव:- विषय क्र. २)** प्रभाग समिती क्रं.३/७ मधिल सन २०१८-१९ चे गुंठेवारी देय्यक रक्कमा निर्लेखित करणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ९२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग समिती क्र.३ कडील यु.क्र.०३/७ मधील अर्जदार श्री.अमिमनाबी बिस्मील्ला खान व इतर ६, रा.गट नं.२०/१, प्लॉट नं.५९ अ, रजा कॉलनी, जळगांव यांचे सन २०११ ते २०१२ या आर्थिक वर्षापासुन देयकाची मागणी केलेली आहे तथापी गुंठेवारी विकास नियमाकुल आदेशानुसार उपरोक्त ७ जणाची गुंठेवारी प्रकरण नगर रचना विभागाकडून नियमीत केल्याने दंडनीय आकारणी मागणी असलेली रक्कम रु.२०५८२४/- मात्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम १५२ नुसार निर्लेखित करण्यास व डिमांड रजिष्ट्रला नोंद घेणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १५ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सोनवणे सुरेश माणिक**

**अनुमोदक :- कापसे मयुर चंद्रकांत**

**नगरसचिव:- विषय क्र. ३)** म.न.पा.१७ मजली प्रशासकीय इमारत येथील २ हुंडाई मेक उद्वाहकांचा वार्षिक देखभाल दुरुस्तीचा मक्ता (CMC) देणे कामी म.न.पा.अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ (२) (२) अन्वये दर करार करणे / संविदा करणे बाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढढा :-** नविन उद्वाहक लावण्याच्या संदर्भात हा मक्ता आहे. Maintainance चा कॅन्ट्रॅक्ट ही आहे परंतु जेव्हा नविन निविदा प्रक्रिया होईल. नविन प्रक्रिया जर ४ महिन्यामध्ये राबविली गेली. तर हा Maintainance चा कॅन्ट्रॅक्ट ही Subject to condition राहील. नविन निविदा होऊन नविन लिफ्ट लावण्यासंदर्भात प्रक्रिया पुर्णत: जाईल तो पर्यंत हा Annual Maintainance चा कॅन्ट्रॅक्ट करण्यात यावा. नविन लिफ्ट बसविण्याच्या संदर्भात याला secured funds आहे २५ कोटी मधुन हे करण्याचे Provision केलेले आहे. परंतु याला फक्त दोन कंपन्यांनी प्रतिसाद दिलेला आहे. कुठेतरी योग्य कंपन्या येथे येण्यासाठी मागेपुढे का पाहतात हा एक संशोधनाचा विषय आहे. एखाद्या वेळेस मनपा फंडाचे काम असेल आणि म.न.पा.फंडातुन काम करणे संदर्भात पेमेंट वेळेवर मिळेल की नाही याची ही खात्री नसते. आणि तो तसा अनुभवतो ही परंतु ज्या वेळेला निधीची उपलब्धता आहे. २५ कोटीतुन निधीची तरतुद ठेवलेली आहे. जसा मला माझ्या घराची लिफ्ट लावायची होती तर साधारणत: ५-६ लाख रुपयांचा तो खर्च होता. ५-६ लाखासाठी सुध्दा साधारणत: ३-४ कंपनीचे लोकं मला भेटायला येत होते की, आम्ही इतके ठिकाणी लावलेले आहे आमची सर्व्हीस चांगली आहे. परंतु आपण २ ते २.५ कोटीची लिफ्ट बसविण्याची ही निविदा स्विकारत असतांना चांगल्या कंपन्यांचा प्रतिसाद मिळत नाही. त्याच्या संदर्भात सुध्दा चर्चा होणे गरजेचे आहे. दोनच निविदा आलेल्या आहे. परंतु जर योग्य कंपनींनी सहभाग घेतला नाही. स्टँडर्ड कंपन्यांनी जर सहभाग नोंदला तर Original कंपन्या कोणत्या आहे कोणत्या नाही. Multi National कंपन्या आहेत. या जे लिफ्टस लावलेल्या होत्या ते साधारण २० वर्षापुर्वी लावलेल्या होत्या. हे काही स्ट्रीट लाईटचे प्रकरण नाही. खराब झाले की दोन दिवसानंतर Replace करुन टाका. २० वर्षानंतर Replace करण्याच्या संदर्भात भुमिका आपण स्विकारत असतो. १५ ते २० वर्षासाठी उत्तम प्रकारची सर्व्हीस देणाऱ्या कंपन्यांचा असतील त्यांच्या बाबत विचार व्हायला पाहिजे. तर पुनश्च त्यांच्या बाबतीत निविदा मागावे. कारण दोन्ही ही जे कंपन्या आलेल्या आहे ते काही well known कंपन्या आहे असे काही नाही आहे. त्यांचे नांवे ऐकल्यानंतर असे माहित होते की यांचे नावे घेतल्यानंतर या सभागृहातील कोणताही सदस्य यावर विश्वास ठेवणार नाही. जसे OEI इंट्रनेशनल कंपनी आहे. असे कंपन्या नाही आहे. तर मा.सभापती आपण ही या बद्दल विचार होवुन जेव्हा निविदा प्रक्रिया होईल त्या वेळेस या गोष्टींचा विचार करण्यात यावा. आणि माझी लाईट विभागा संदर्भात एक तक्रार आहे. स्टेशन रोडला वल्लभदास वालजी वाचनालय आहे त्यासमोर रस्ता रुंदीकरण केलेला आहे. रस्ता रुंदीकरण केल्यानंतर एक ट्रान्सफार्मर शिफ्टींग करण्यासंदर्भा दोन वर्षापुर्वी सगळी प्रक्रिया पुर्ण करुन ट्रान्सफार्मर बदलण्याच्या संदर्भात मक्तेदाराने पोल ही उभे केले. आणि काम सुरु असतांना त्याने ट्रान्सफार्मर आपल्या पोलवर शिफ्ट करुन टाकले. त्यांनी त्यांचा ट्रान्सफार्मर शिफ्ट केला परंतु आपला ट्रान्सफार्मर जसाचा तसा आहे. आणि त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. पोल उभे आहे. मी स्वत: व्यक्तीगत त्याचा Follow up दोन वर्षापासुन घेत आहे. परंतु जर काम अश्या पध्दती ने चालु असेल तर ही बाब जी आहे ही चिंतेची बाब आहे. तर आपण ही या संदर्भात लक्ष घालुन हे काम करणे या संदर्भात अपेक्षित आहे.

श्री.अरुण पाटील :- MSEB च म्हणणं अस आहे, जेव्हा आपण पत्र दिले तर ते अंदाजपत्रिकाचा अहवाल द्यायला तयार नाही आहे. त्यांचे म्हणणं अस आहे की, याच्या संदर्भात आम्ही नविन अंदाजपत्रक बनवणार आहे. तसे पत्र तुम्ही आम्हाला द्या आणि तस त्या पध्दतीने उर्वरीत काम पुर्ण केले जाईल म्हणतात. परंतु तयार केलेल्या अंदाजपत्रानुसार काम पुर्ण करण्यात यावे असे पत्र आपण तयार केलेले आहे आणि त्या संदर्भात आम्ही त्यांना भेटायला जाणार आहे.

**श्री.**नितीन लढढा :- ही खुप पुर्वीची गोष्ट आहे. माझ्या मते मी महापौर असतांना मी यांना पाठपुरावा केला आहे यांना अडचण असतांना MSEB च्या वरिष्ट अधिकाऱ्यांशी मी बोलायचो. यांचं कसे आहे की मला आठवण येईल तेव्हा यांना आठवण येईल कारण ही माझी चुकी नाही. ही यांची चुकी आहे. यांना येणाऱ्या अडचणी यांनी आपल्या

कानावर टाकायला हवे. माझ्या कानावर टाकायला हवे. तर त्यानुसार आपण त्या ठिकाणी सुध्दा Follow up घ्यायला तयार आहोत. परंतु ही जी मानसिकता आहे अत्यंत चुकीची मानसिकता आहे. ९०% काम झाले परंतु ९०% काम झाल्यानंतर त्या समस्याचा निवारण झाले का ? म्हणजे तो पोल ज्या ठिकाणी वाहतुकीला अडथळा होतो तसाच आहे म्हणजेच रस्ता रुंदीकरणाचा फायदा काय ? तो पोल अडथळा असुन त्याच रस्त्यावर उभा आहे. जरी काम ९०% झाला असेल परंतु त्याचा काही उपयोग होत नाही ना.

**मा.**सभापती :- थोडे फार त्यांनी आभार मानले पाहिजे असे कामे तर करा.

**श्री.**अरुण पाटील :- ८ दिवसात जर त्यांनी प्रतिसाद नाही दिला तर नविन अंदाजपत्रक बनवुन लावुन टाकु.

**श्री.**विष्णू भंगाळे :- अध्यक्ष महोदय, आपले जे बी.जे.मार्केट आहे त्याला इतका मोठा इलेक्ट्रीकचा वळसा पडलेला आहे की, मध्येच वायरी कुठून जातात हे कळत नाही. मार्केट एरिया आहे त्याठिकाणी दुकाने बंद होती त्या ठिकाणी आग लागली परंतू सुदैवाने संध्याकाळ होती ती ७ वाजता लागली म्हणुन ती लक्षात आली जर थोडी उशीराही लागली असती तर पुर्ण मार्केट जळुन खाक झाले असते. अशी परिस्थिती तेथिल आहे. तेथिल इलेक्ट्रीक वायरींगची जबाबदारी कोणाची आहे ? आजची जी वायरींगची पोझीशन आहे किंवा आपण जो तेथिल रहिवाश्यांना सप्लाय पुरविलेला आहे या दुरुस्तीच्या बाबतीतील आणि तेथिल मेंटेंनन्स याच्या बाबतीतील कार्य कोणाकडे आहे ?

**मा.**आयुक्त :- भोळे साहेब ही जबाबदारी कोणाची आहे ?

**श्री.**सुनिल भोळे **:-** मार्केटच्या मेंटेंनन्सची जबाबदारी आपल्या महापालिकेची आहे.

**श्री.**अरुण पाटील :- तेथिल इलेक्ट्रीकची संपुर्ण जबाबदारी विज वितरण कंपनीचीच आहे. पाणी गळती आहे त्याच्या मध्ये. त्यासाठी जे संबंधीत इंजिनिअर आहे बांधकाम विभागाचे त्यांना ही अवगत करण्यात आलेले आहे शहर अभियंता यांच्या मार्फत. पाणी गळतीमुळे ते शॉटसर्किट झालेले होते.

**मा.**आयुक्त :- त्याठिकाणी जी पाणी गळती आहे ती तात्काळ करुन घ्या. आणि एखादे काम आपण सांगतो आणि ते कामामध्ये ते काम तसेच राहून जाते आणि परत ते अंगावर आलेवर तेथे असे होते.

**श्री.**दिलीप पोकळे :- आयुक्त साहेब, आढावा बैठकीमध्ये काही लाईट विभागाचे कर्मचाऱ्यां संदर्भात कहार साहेबांशी सुध्दा चर्चा झालेली होती. त्यांनी ही खुलासा करावा की त्यांनी काय कारवाई केली. आढावा बैठकीला आता ३-४ महिने झालेले आहे. या विषायी संपुर्ण नगरसेवकांनी ही तक्रारी केलेली होती. यांना विचारा यांनी काय कारवाई केलेली आहे.

**मा.**आयुक्त :- बऱ्याच वेळेला असे होते की तो विषय आटपून गेल्यानंतर तोच विषय येतो आणि परत तिच परिस्थिती असते.दोन महिन्यापुर्वी आम्ही सुप्रिमच्या संदर्भात तिथे गेलो होतो. २ महिन्यापुर्वी जशी परिस्थिती होती तशीच परिस्थिती थोडया थोडया प्रमाणात आज आहे.याच्यामध्ये आपले विभाग प्रमुखांनी अतिशय दक्षता घेणे काळजीचे आहे. आणि दुसरी बाब अशी जाणवते आणि सर्वीकडेच जाणवते आपण काम करतो पण आपण का काम करतो तेच कळत नाही. जेव्हा ते कळेल त्यावेळेस असे जे प्रकार आहे २-२.५ वर्षानंतर ९०% काम झाले आहे १०% राहिलेला आहे. ते १०% किंवा Purpose काय आहे कामाचा हे सुध्दा आपण विचारात घेणे आवश्यक आहे. विभाग प्रमुख सर्वे सुशिक्षीत आहे तर हे थोडी जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे.

श्री.नितीन लढढा :- या सभेला येण्यापुर्वी सुप्रिम कॉलनीचे जे नगरसेविका आहे जिजाताई भापसे त्यांचे चिरंजीवचा मला फोन आला. साधारणत: १२ दिवस एका भागाला आणि साहित्या नगरला २२ दिवस झाले आहे पाणी पुरवठा नाही. आपण सुप्रिम कॉलनीला पाणी पुरवठा सुरळीत व्हावा या दृष्टीकोनातुन सर्व जळगांव शहराला दोन दिवसा ऐवजी तीन दिवस आड पाणी देण्याचा निश्चित केलं. परंतु ते धोरण निश्चित केल्यानंतर जळगांव शहर संपुर्ण दोन दिवसा ऐवजी तीन दिवसावर गेलं. ज्यांच्यासाठी तर सुप्रिम कॉलनीच्या काही भागात १२ दिवस तर काही भागात २२ दिवस सप्लाय होत नाही कारण याचा निम्मा सप्लाय झाला आणि बंद झाला. २५ लाख रुपये आपण एम.आय.डी.सी.ला भरले. विहीर खोदुन घेतली पण पंपाची व्यवस्था होत नाही. विहीर खोदायला आपण खुप घाई केली. २५ लाख भरुन दिले. परंतु त्याचा उपयोग नाही. आता १५ दिवस होऊन गेले. या तीन चार दिवसात निसर्गामुळे पाणी पुरवठा उशारा झाला. जर पाऊसाळा सुरु झाला असता तर पाण्याची कमी आली नसती. परंतु त्या भागातील नागरीकांना आज ही समाधान नाही. हे तुम्ही माहिती घ्या. मी त्यांना बोलविले होते पण ते आले नाही. त्या सदस्यांना ही बोलविले होते मी. १२-१२ दिवस पाणी नाही मला सांगा. त्यांच्याकडे स्टोअरेज कॅप्यासीटी नाही. भाग वरचा असल्यामुळे बोरींगांना पाणी लागत नाही. अश्या परिस्थिती मध्ये धोरण आपण शहरासाठी वापल्यानंतरही त्याचा फायदा होत नसेल तर त्याचा आपण विचार करावा.

मा.आयुक्त :- या संदर्भात आपण कुठलेही काही केलेलं नव्हतं. असे नाही. सर्व नगरसेवकांना सुध्दा माहिती पाहिजे. पुर्वी आपण एम.आय.डी.सी.कडुन पाणी घ्यायचो आणि त्याचे बिल ८ कोटी बाकी होते. ज्या वेळेला आपण हा प्रस्ताव मांडला होता. तर त्यांनी सांगितलं की कमीत कमी ५०% तरी भरा. तेव्हा मी Adjustment केली आणि सांगितलं की २५ लाख तरी भरा. आणि आपण ते चालु करु.

श्री.नितीन लढढा :- साहेब आपण सांगितलं की, ५ लाख भरतो. मग सांगितलं १० लाख भरतो.

मा.आयुक्त :- परिस्थितीच तशी आहे.

श्री.नितीन लढढा :- याला पुढची भुमिका चुकीची आहे असे नाही. महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीच्या अनुषंगाने तुम्ही योग्य भुमिका मांडली ५ लाख भरतो १० लाख भरतो. माझा प्रश्न तो नाही आहे. माझा प्रश्न २५ लाख भरण्याचा नाही आहे. परंतु त्याचा उपयोग वेळेवरती नाही झाला. उद्या पाणी सुरु झाल आणि एम.आय.डी.सी.कडुन पाणी मिळाले तर त्या नागरीकांना त्या पाण्याची गरज राहणार नाही. माझा सांगण्याचा तात्पर्य इतकेच आहे की योग्य वेळी योग्य कामाची अंमलबजावणी व्हायला पाहिजे.

मा.आयुक्त :- त्या संदर्भात एम.आय.डी.सी.चे जे Chief Executive Officer आहे ते आणि आम्ही एकत्र काम पाहायला गेलो होतो. आणि आपले आमदार साहेब पण तिथे होते. त्यामुळे ते २५ लाख पर्यंत निधी Sanction झाले. त्यानंतर विषय आले मिटर बसविणे पाईप लाईन वापरात नाही. त्यामुळे आपण जैन इरिगेशनला विनंती केली. आणि त्याच्या प्रमाणे मिटर बसविले. आज सकाळी मी त्या ठिकाणी जाऊन आलो. आज एम.एस.ई.बी.चा शटडाऊन असल्यामुळे ते आज सुरु होईल.

श्री.नितीन बरडे :- विष्णु भाऊंचे बी.जे. मार्केटच उत्तर नाही मिळालं.

मा.आयुक्त :- बी.जे. मार्केटच सांगितलं की ती MSEB ची जबाबदारी आहे. तिथे जी Leakage आहे त्याची जबाबदारी आपली.

श्री.नितीन बरडे :- साहेब आपल्याकडे सामान किती Available आहे.

श्री.अरुण पाटील :- मागणी केलेली आहे आणि त्यानुसार नविन जे मटेरिअल आले. आणि युनिटाला मागणी करण्यात आलेली आहे. आणि सहा महिन्यासाठी किती मटेरिअल लागेल त्याप्रमाणे काम चालु आहे.

श्री.नितीन बरडे :- काही मटेरिअल घेतलेले असेल. आज एल.ई.डी. आपण बंद केलेले आहे. कामे बंद आहे.

मा.आयुक्त :- ज्या ठिकाणी लाईट बंद आहे त्या ठिकाणी आपण साहित्याची व्यवस्था करु.

श्री.नितीन बरडे :- सुर्वे साहेब माझ्या प्रभाग मधले आहे. आता फक्त एक स्वीच मुळे पुर्ण कॉलनीचे लाईट बंद आहे. मी फिरत आहे त्या कॉलनीसाठी शेवटी मी सुरु केली ते लाईट डायरेक्ट वायर जोडुन.

श्री.विलास सुर्वे :- Actually मी आज स्वीच घेतलेला आहे. आज संध्याकाळ पर्यंत काम पुर्ण होईल.

श्री.नितीन बरडे :- एम.एस.ई.बी. चे काही लाईट आहे त्याला स्ट्रीटची वायर नाही आहे. फक्त ५० मिटर वायर लागणार आहे ते स्ट्रीट लाईट चालु बंद होतील. त्याचमुळे ते लाईट २४ तास चालत आहे.काही लाईट ांची वायरी जोडलेली नाही. ही परिस्थिती आहे. स्टेट बँक कॉलनी भागातली.

मा.सभापती :- सोमवार पर्यंत काम झाल्याचा रिपोर्ट मिळेल का ?

श्री.विलास सुर्वे :- आज संध्याकाळ पर्यंत मिळेल.

मा.सभापती :- नितीन भाऊ आज संध्याकाळ पर्यंत काम होईल.

श्री.नितीन बरडे :- चार दिवसापुर्वी मी त्यांना घेऊन फिरलो व त्यांना दाखविले की किती लाईट बंद आहे. माझा एम.जे.कॉलेज परिसर किती मोठा आहे. सर्व दाखविल्यानंतर यांच उत्तर काय भेटते की भाऊ आम्ही ऐवढा काम करु शकत नाही एका दिवसात.

मा.आयुक्त :- विषय लक्षात आला. दुसरा विषय असा की, कर्मचाऱ्यांची ही जी मानसीकता आहे ती बदलायला पाहिजे. हे कर्मचारी इथेच नियुक्त झाले काम करणार आहे, आपलेच नागरीक असणार आहे आणि आपलेच मतदार आहे. आता या साठी आम्ही असा एक Drive घेत आहोत की, जे कर्मचारी वयाच्या ५० आणि ५५ वर्ष पुर्ण झालेली आहे आणि त्यांची सेवा ३० वर्ष झालेली आहे त्यांच्या संपुर्ण कार्यकाळाचा आढावा घेऊन जर ते कामाला सक्षम नसतील तर त्यांना Compulsory Retirement ची मोहिम हाती घेणार आहोत. हे पहा ही महानगरपालिका आहे. अस कधी होणार नाही तुम्हाला काही प्रश्न नाही मला बोलायची गरज पडणार नाही, सर्व कर्मचारी आनंदात आहे. सगळी जनता आनंदात आहे अस होणार नाही. फक्त हे लवकर कराव.

श्री.सदाशिव ढेकळे :- आपण विषय पत्रिकेवरचे विषय आटोपल्यानंतर मग उर्वरित विषय घ्यावे , त्यादिवशी महासभा सायंकाळी पावेतो चालली त्यादिवशी जेवायला काही नव्हते मला ॲसिडीटी चा त्रास आहे त्यावेळी जवायचा विषय काढला होता जेवायला जाऊ दिले नाही तर या विषयपत्रिकेवरील विषय आटोपल्यानंतर सर्व बाकी

विषयांवर चर्चा झाली पाहीजे .कुठल्याही सदस्याने मत मांडु नये असे मी म्हणत नाही. सर्वांना विनंती आहे की खासकरून दोघेही नितीन भाऊ आणि भंगाळे भाऊ की आपण सदर चर्चा नंतर करू.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ९३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, म.न.पा. १७ मजली प्रशासकीय इमारत येथील २ हुंडाई मेक उद्वाहकांचा देखभाल दुरुस्तीचा वार्षिक मक्ता (CMC) कार्यादेश क्र.विद्युत/प्रशा.इमा./कार्या-१ दि.०२/०४/२०१८ अन्वये हुंदाई उद्वाहकांचे मुळ उत्पादक कंपनीशी संलग्न असलेले मक्तेदार हुंदाई इलेव्हेटर अण्ड मुव्हमेंट टेक्नॉलॉजीस लि.पुणे यांना दि.१ फेब्रुवारी २०१८ पासुन १ वर्षासाठी देण्यात आलेला होता. सदर मक्त्याची मुदत दिनांक ३१ जानेवारी २०१९ रोजी संपुष्टात रोजी संपुष्टात आलेली असुन दि.०१ फेब्रुवारी २०१९ पासुन पुढील १ महिना कालावधी करीता सदर कार्यरत मक्तेदारास मागील वर्षाचे मंजुर दरात शहर अभियंता यांचे मान्यतेने मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर मुदतवाढ दि.२८ फेब्रुवारी २०१९ रोजी संपुष्टात येत असल्याने तत्पुर्वी सदर कामी नविन मक्ता १ वर्षासाठी निश्चित होणे आवश्यक आहे. सदर कामी मागील वर्षाचे मंजुर दर एक महिन्याकरीता दोन उद्वाहकांसाठी रु.५४,१६७/- + प्रचलित टॅक्सेस या प्रमाणे आहेत.

म.न.पा. प्रशासकीय इमारतीतील जुनी सर्व ६ उद्वाहके निष्कासित करुन त्या जागी नवीन उद्वाहके बसविण्याचे काम प्रस्तावित आहे. या कामी काही कालावधी लागणार असल्याने प्रशासकीय इमारतीतील दोन हुंडाई मेक उद्वाहकांचा वार्षिक देखभाल दुरुस्तीचा मक्ता (CMC) देणे गरजेचे आहे.

म.न.पा. प्रशासकीय इमारतीतील दोन हुंदाई उद्वाहकांकरीता सध्या चालु असलेल्या वार्षिक देखाभाल दुरुस्तीच्या मक्त्याचे वार्षिक दर एकुण रु.६,५०,०००/- + प्रचलित टॅक्सेस या प्रमाणे असुन त्यात १०% नैसर्गिक अपेक्षित वाढ धरल्यास एकुण वार्षिक रु.७,१५,०००/- +प्रचलित टॅक्सेस या प्रमाणे एकुण रु.८,४३,७००/- रुपयांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते. सदरची उद्वाहके जुन्या असुन त्यांचे सुटे भाग व त्याचे कंट्रोलिंग प्रोग्राम हे मुळ उत्पादक कंपनीकडेच असल्याने मुळ उत्पादक कंपनीशी संलग्न असलेल्या कंपनीलाच (CMC) देणे गरजेचे असल्याने मक्तेदार कायनेटीक हुंडाई इलेव्हेटर अण्ड मुव्हमेंट टेक्नॉलॉजी पुणे यांचेकडुन CMC कामी प्रस्ताव मागवुन दर मागविण्यात आले होते.

प्रशासकीय इमारतीतील २ हुंडाई मेक उद्वाहकांचे वार्षिक देखभाल दुरुस्ती कामी हुंडाई उद्वहकांचे मुळ उत्पादक कंपनीशी संलग्न असलेले मक्तेदार कायनेटीक हुंडाई इलेव्हेटर्स अण्ड मुव्हमेंट टेक्नॉलॉजी लि.पुणे हे कार्यरत असुन त्यांनी त्यांचेकडील दि.३१/०१/२०१९ रोजीचे पत्रात नमुद केलेनुसार दि.०१ मार्च २०१९ ते २९ फेब्रुवारी २०२० या एक वर्षाचे कालावधी करीता वाटाघाटी अंती दिलेल्या एकुण दर रु.६,८२,५००/- + प्रचलित टॅक्सेस यांनी वाटाघाटी अंती दिलेले वार्षिक एकुण दर रु.६,८२,५००/- + प्रचलित टॅक्सेसचे वार्षिक दर महाराष्ट्र म.न.पा. अधिनियम १९४९ मधील अनुसुचि ड मधील संविदा प्रकरण ५ चे नियम २(२) चे परंतुकात नमुद तरतुदी अन्वये निविदा न मागविता स्विकृत करणेस तसेच सदरचे खर्चास मान्यता देणेस व मक्तेदाराशी संविदा करणे कामी मा. आयुक्त सो.,यांना प्राधिकृत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १५ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- सोनवणे सुरेश माणिक**

**नगरसचिव:- विषय क्र. ४)** महानगरपालिका आरोग्य विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ एम ९२०० (मैला व्हॅक्युम) या वाहनाची मेजर दुरुस्ती करणे कामी रक्कम रु.६२,४१०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.नितीन लढढा :- अजेंडयावरील जे विषय आहेत ते आम्हाला मान्य आहेत परंतू या व्यतिरीक्त जे विषय आहेत त्यावर प्रत्येकाने कमीत कमी १० मिनीटे चर्चा करू द्यावी , तसेच सर्व विषय सर्वानुमते मंजूर करणेस हरकत नाही , चर्चा करणेसाठी जर आपण परवानगी देत असाल तर मी चर्चा करू का ?

मा.सभापती :-चर्चा म्हणजे आपण विचारून घेवु ना .

श्री.विष्णू भंगाळे :- सभापती महोदय चर्चेकरीता वेळ ठरवुन घेवु आपण.

श्री.नितीन लढढा :- माझी विनंती आहे की यापुढे सभा आपण सकाळी ११.०० वाजता घेत चला , मागेही मी विनंती केली होती . असे नाही आम्ही यापुर्वी सत्तेत असतांना दर शुक्रवारी आणि सकाळी ११.०० वाजेची वेळ ठरवुन घेतली होती . त्यामुळे कुणी अधिकारी व सदस्यांना ही माहिती असायची की दर शुक्रवारी मिटींग असते अशा पध्दतीचे आठवडयाभराचे नियोजन करायचे कारण ११ वाजेला मिटींग सुरू झाली की साधारण १२ ते १२.३० वाजेपर्यंत मिटींग संपते.

मा.आयुक्त :- यासंदर्भात माझी एक विनंती आहे या सभागृहाला आठवडयातुन एक मिटींग घेणे कंम्पलसरी आहे कुठलाही दिवस असो एकदा तो फीक्स झाला म्हणजे ॲटामेटीक अजेंडा त्यावेळेचा निघुन जाईल आणि ११ वाजेची वेळ योग्य आहे आणि दिवस सुध्दा सोमवार सोडुन आपण ठरवुन घ्यावे .बऱ्याच ठिकाणी पुणे, पिंपरी चिंचवड ला मंगळवार असतो आपल्या वेळेनुसार वार काय असेल तो ठरवावा आणि आठवडयातील एक दिवस फीक्स करावा. जर काही विषय नाही आले बऱ्याच वेळा असेही होते की विषयच येत नाहीत . मागील विषयाचे कार्यवृत्त कायम करणे आणि आढावा घेणे असे दोन विषय ते कंम्पलसरी करून घेणे .

श्री.नितीन लढढा :- सभापती महोदयांनी परवानगी द्यावी की सर्व सदस्यांनी ५/५ मिनिटे सर्व सदस्यांना चर्चा करू द्यावी . सर्वात महत्वाचा विषय मा.आयुक्त साहेब आमचा प्रभाग क्रं.५ जेथे महानगरपालिकेची इमारत आहे तो प्र.क्रं. ५ आहे , फुले मार्केट आणि संपुर्ण व्यापारी बाजारपेठ असलेला प्रभाग आहे. अतिक्रमणाच्या संदर्भातील भुमिका जी आहे यापुर्वी किशोर राजे निंबाळकर साहेब आयुक्त साहेब होते त्यांच्या हातुन मोठया प्रमाणात मोहीम यशस्वीरित्या करण्यात आलेली होती तदनंतर मा.डांगे साहेब आले त्यांनी सुध्दा त्या प्रोसेस ला कंटीन्यु ठेवले होते . परंतु आज असे दिसुन येते की ते मी फोटोग्राफ आणलेले आहे ते मी आपणांस देतो दाणा बाजाराजवळील शिवाजी रोड येथे बऱ्याच वर्षापासुन हॉकर्स झोन होते आणि तेथे त्यावेळी हॉकर्स होते निंबाळकर साहेबांनी तेथे मोहीम राबविली आणि निघाले डांगे साहेबांनी सुध्दा ते कंटीन्यु केले , आज त्याठिकाणी पुर्वी जी परिस्थिती आहे ती जैसे थे तैसे अशी परिस्थिती आहे .याउलट ते लोक आता हळुहळु वाढत वाढत नवि पेठ भागात पोहोचलेले आहेत .म्हणजे कीती भयावह परिस्थिती आहे जर कधी आपण अतिक्रमण विभाग याच कामासाठी वापर करीत असु तर त्याचा काहीच उपयोग होतांना दिसत नाही .की आज जर कोणी तक्रार केली आपले विभाग उलट त्यांना इंटीमेट करत असतात त्यांची इतकी सिस्टिम चांगली आहे की कार्यवाही करण्यापुर्वी त्यांना इंटीमेट केले जाते की आज आमची कार्यवाही तुमच्या भागात आहे. तक्रार कोणाचीही असो जसे विष्णु भाऊंची तक्रार , नितीन भाऊंची , किंवा कुणाची ही तक्रार असली तर ती तक्रार एक्सपोज करण्याचे काम हे विभाग करत असते . तर का अशा पध्दतीचे धोरण अंवलंबवायचे असेल तर आपला जो विषय आहे की हगणदारी मुक्त शहर तसे अतिक्रमण च्या बाबतीत असेल तर अतिक्रमण मुक्त शहर पण ते होणार नाही परंतू असे होवु शकते कारण दोन गोष्टींचेच नावे लावले जातात , त्याला प्रसिध्दी करणे गरजेचे आहे एकतर स्त्री प्रसिध्दी किंवा बहुप्रसिध्दी या पध्दतीने करावे , परंतू परिस्थिती अशी आहे की आपण या विभागावर आस्थापनावर मोठयाप्रमाणात खर्च करत आहोत . परंतू त्याचा उपयोग काहीच होत नाही . अतिक्रमण पथक गेल्यानंतर मोजून १५ मिनीटांनी तुम्हाला परिस्थिती जैसे थे तशीच दिसेल म्हणजे आपण आस्थापना खर्च तसेच वेळोवेळी पोलीस बंदोबस्त मागतो तो ही खर्च तोही आपला वाया जातो तर अशा पध्दतीने काय होणार . अशा कार्यपध्दतीचे काम स्टिक्टली राबविले जात असेल तर त्याचा फायदा आहे. नसेल तर त्याचे उच्चाटन करून टाका . आणि नविन विभाग सोपवुन टाका , की अतिक्रमण संबोधन आणि संरक्षण विभाग असे नाव द्यावे म्हणजे आम्ही त्यांचे संबोधन ही करू आणि संरक्षण ही देणार आहोत .ज्याला काय अतिक्रमण करायचे त्याने कराव ज्याने जो व्यवसाय असेल तो त्याने करावा कारण परिस्थिती ही पुर्व पदावर चालली आहे . पुर्वी असे नव्हते हळुहळु ३ ते ४ वर्षा पुर्वी असे नव्हते परंतु आता तो रस्ता पुर्ण अतिक्रमणित गेला , जिल्हाधिकारी बंगल्याचा रोड जो आहे जेथे जास्त प्रमाणात निवासस्थाने आहेत हळु हळु तो महाबळ पर्यंत वाढलेले आहे तेथे महाबळ मध्ये ही बघा आपण तेथेही संपुर्ण बाजारपेठ असते . आकाशवाणी चौकात सुध्दा तुम्हाला गॅप मिळणार नाही ईतकी भयावह परिस्थती आहे , टॉवर चौका पासुन कैलास अप्पाच्या घराकडे जातांना तुम्ही टाईम लावा घडयाळावर तुम्ही जाऊ शकणार नाही . आणि याचा सगळयात जास्त त्रास जो आहे प्रभाग क्रं. ५ माझा आहे. कारण त्याच्या मध्ये सगळयात जास्त बाजारपेठा आहेत त्यामध्ये आहेत. ज्यावेळेला डांगेसाहेबांनी कार्यवाही केली होती . त्यावेळी १ ते दिड फुटाचे उंच ओटे तोडण्यात आले होते वेदरशेड सुध्दा होते परंतु कामामध्ये कुठेतरी सुसुत्राता यावी त्याकरीता ते वेदरशेड सुध्दा तोडण्यात आले आहेत.परंतु झाले काय तुम्ही जुन्या बाजारपेठेतुन गेले तुम्ही तुमचा फोन बंद करून जा तुम्ही सांगाल ते बक्षीस मी तुम्हाला देईल. किंवा तेथील तुम्ही वेदरशेड काढली तरी देईल इतकी भयावह परिस्थिती आहे. म्हणजे ७५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली होती आणि कार्यवाहीवेळी आम्ही कोणताही हस्तक्षेप केलेला नाही . आम्ही सांगीतले तुमचे अतिक्रमण बेकायदेशीर असेल तर

ते तोडावे लागेल परंतु त्या दुकानदारांचे आज आम्हाला ऐकावे लागते की या अतिक्रमणाचे तुम्ही आता काय करणार , लोकांना स्वत:च्या दुकानामध्ये जायला सुध्दा जागा मिळत नाही त्यांना त्यांचे वाहन सुध्दा दुकानासमोर उभेकरता येत नाही . म्हणजे जो अतिक्रमण करतो त्याच्या शिव्या दुकानदाराला खाव्या लागतात अशी परिस्थिती अतिक्रमणाच्या बाबतीत शहरामध्ये निर्माण झालेली आहे . यामध्ये आपण सामान्य फेरीवाल्यांना त्रास द्या असे काही म्हणत नाही , परंतु कुठेतरी डिसीप्लीन , शिस्त पाहीजे , खॉजामियाची व्यापारी संकुलाची जागा या भाजी विक्रेंत्याना शिफ्ट करण्यासाठी दिलेली होती , आपण तेथे १० ते १५ लाख रूपये खर्च केलेला आहे . आपण तेथे लाईट चे पोल उभे केले असुन त्यांना सर्व सुविधा देण्यात आलेल्या आहेत . एक ही जागा आहे आणि दुसरी सानेगुरूजी रूग्णालयाची जागा आहे ती जागा आपण पार्कींग म्हणुन वापरात आहे. पर्याय आपण दिलेले होते आणि चांगल्याप्रकारे आपण देवु शकलो असे नाही तसेच व्यापारी जसे जाचक असतील तर त्यावेळेला त्या हॉकर्स ला बोलायला जागा असते , आपण त्यांना सांगु शकतो की आम्ही तुमची पर्यायी जागेवर व्यवस्था करत आहेत तुम्ही पर्यायी जागेवर स्थलांतरीत व्हा . दोन्ही जागा महापालिकेच्या आहेत त्याचा पर्यायी जागेसाठी चांगल्या पध्दतीने उपयोग होवु शकतो . रस्ते हे कधीही वाहतुकीला मोकळे राहायला हवे. मा.सभापती महोदय आपण स्वत: याबाबतीत जागेवर जाऊन बघा आणि काय परिस्थिती आहे या उपाययोजनांनवर सुध्दा विचार करावा ही माझी विनंती आहे.

सौ.उज्वला बेंडाळे :- मा.सभापती व मा.आयुक्त साहेब मला वैद्यकीय अधिकारी यांना विचारायचे आहे की ,आपल्या कडे महालॅब अशी काही योजना आपल्याकडे शासनाकडुन आपल्याकडे आलेली आहे कां ?

प्रमुख वैद्यकीय अधिकारी :- होय . ती योजना सुरू झालेली आहे .

सौ.उज्वला बेंडाळे :- कधी पासुन सुरू झाली आहे .

प्रमुख वैद्यकीय अधिकारी :- मागच्या महिन्यापासुन सुरू झालेली आहे.

सौ.उज्वला बेंडाळे :- या योजनेमध्ये काय काय आहे.

प्रमुख वैद्यकीय अधिकारी :- त्यामध्ये आपल्या रुग्णालयात जे पेशंट येतात त्यांची रक्त , लघवीची चाचणी करायची असते सौ.उज्वला बेंडाळे :- त्या चाचण्या कोण करत.

प्रमुख वैद्यकीय अधिकारी :- महालॅब चे लॅब टेक्नीशियन येतात व ते करतात .

सौ.उज्वला बेंडाळे :- ते आपल्या कडे आहेत का आता .

प्रमुख वैद्यकीय अधिकारी :- हो , दवाखान्याच्या मॅडम येतात व ते सॅम्पल कलेक्ट करून घेवून जातात व दुसऱ्या दिवशी ते रिपोर्ट देतात.

सौ.उज्वला बेंडाळे :- शासनाचे लोक येतात का .

प्रमुख वैद्यकीय अधिकारी :- नाही महालॅप्स चे येतात.

सौ.उज्वला बेंडाळे :- मग आपले कोणी नाही का त्याठिकाणी , त्याचे चार्जेस कोण देते .

प्रमुख वैद्यकीय अधिकारी :- त्यांना शासनाकडुन चार्जेस दिले जातात तसा शासनाचा व त्यांचा कॉन्ट्रक्ट झालेला आहे . आपण फक्त त्यांना रिपोर्ट देतो की या महिन्यात आपण एवढया रुग्णांची तपासणी केली त्यानंतर त्यांना शासनाकडुन त्यांना ठरल्यानुसार पमेंट दिले जाते.

सौ.उज्वला बेंडाळे :-जर ही माहिती तुम्ही सर्व नगरसेवकांना दिली. तर प्रत्येक नगरसेवकांच्याकडे Slum Area आहे. तर त्यांना ही माहिती देणे गरजेचे आहे की नाही ?

मा.सभापती :- आम्ही ही माहिती नागरीकांपर्यंत कोणाच्या माध्यमातुन पोहचु,

प्रमुख वैद्यकीय अधिकारी :- ते जसे येतात आपण त्यांना कळवितो.

मा.सभापती :- त्यांना कळणार कसे की आपल्याकडे व्यवस्था आहे या योजनेची.

प्रमुख वैद्यकीय अधिकारी :- सर आता सुरु झालेली आहे ही योजना १ महिना झाला.

मा.सभापती :- मागच्या महिन्यात म्हणजे ३० दिवस झाले ते.

प्रमुख वैद्यकीय अधिकारी :- ही आपली योजना नाही राज्य शासनाची योजना आहे.

सौ.उज्वला बेंडाळे :- ही माहिती नगरसेवकांना सांगायला पाहिजे. मिटींग होत असते तर तसे कळवायला पाहिजे म्हणजे आम्हीपण नागरीकांना सांगु शकतो किंवा तुम्ही स्वत: जनजागृती करायला पाहिजे.

प्रमुख वैद्यकीय अधिकारी :- आता आम्ही नक्की करु.

मा.आयुक्त :- आपली आठवडयाची जी स्थायी सभा आहे. त्यात जे काही सर्व नवीन योजना आहे ते Standing Committee समोर ठेवावे.

श्री.चेतन सनकत :- मागच्या महिन्या आपण जे सर्व कर्मचाऱ्यांचे पेमेंट केले ते कोणत्या महिन्याचे केले.

मुख्यलेखा परिक्षक :- आपण मे २०१९ पर्यंतचे सर्व वेतन अदा करण्यात आलेले आहे. फक्त Deduction आपण दिलेले नाही.

श्री.चेतन सनकत :- आपल्याकडे मेलेले जनावरे उचलणारे दोन कर्मचारी आहे त्यांचे पेमेंट किती दिवसापासुन थांबलेले आहे ते सांगावे. ते मानधनावर आपल्याकडे काम करत आहे.

मा.आयुक्त :- तो विषय झालेला आहे काल संध्याकाळीच, आज त्यांचे पेमेंट देणार.

मा.सभापती :- मागच्या मिटींगला आपण विषय मांडला होता की, कमीत कमी सर्व नगरसेवकांना तीन तीन महिन्याचे मानधन मिळावे तर सर्वांच्या खात्यात तीन तीन महिन्याचे मानधन जमा झालेले आहे.

श्री.नितीन लढढा :- सभापतींचे ही धन्यवाद आणि प्रशासनाचे ही धन्यवाद.

श्री.नितीन बरडे :- साहेब माझे मागचे बाकी आहे.

मा.आयुक्त :- जशी जशी परिस्थिती सुधरेल तसे सर्व मागचे पेमेंट करु.

श्री.नितीन बरडे :- माझे जवळपास ४ लाख रुपये बाकी आहे.

मा.आयुक्त :- १ एप्रिल २०१९ पासुन कोणाचेही मानधन काढलेले नाही.

श्री.विष्णु भंगाळे :-आजच्या तारखेत जे एल.ई.डी.बसविलेले आहे त्याचे नियोजन काय ? श्रीराम मंदिर ते कोर्ट हा जो परिसर आहे वर्दळीचा परिसर आहे. एस.पी.ऑफिस आहे बस स्टॅण्ड आहे इकडे कोर्ट ऑफिस आहे. येथे ३० ते ४० लाईट आज सुध्दा बंद आहे. याच्याबाबत प्रशासन करतं काय ?

श्री.अरुण पाटील :- जे कॉन्ट्रक्टर आहे त्यांना बोलविण्यात आले होते आणि त्या मिटींग मध्ये त्यांनी Promise केलेले होते. पण मिटींग मध्ये त्यांनी पार्टली कॅमप्लिशन ची मागणी केली आहे. ते भेटल्याशिवाय ते चालु करणार नाही असे त्यांचे म्हणणे आहे. आता महासभेला जेव्हा ठराव होईल तेव्हा ते करावे लागतील.

श्री.विष्णु भंगाळे :- मागच्या मिटींगला मी जरी नव्हतो. तर मागच्या मिटींगपासुन आजपर्यंत ते ३०-४० लाईट बंदच आहे तर संपुर्ण जळगांव शहराचे लाईट बंद ठेवा अस असेल तर.

मा.आयुक्त :- आता आपण जे निर्णय घेता घेतला त्याचा ठराव अजुन आपल्याकडे आलेला नाही. तो ठराव आलेनंतर जे काही Process आहे ती Process सुरु होईल. ३१ मे २०१९ ला हा कॉन्ट्रक्ट संपलेला आहे. जर आज आपण त्याला बोलवुन काही केलं तर ते Contempt of Contract होईल. त्याच्या समोर आपण हा विषय ठेवु की ज्या ठिकाणी त्यानी बसविलेले आहे त्या ठिकाणी व्यवस्थीत बसविण्याची व्यवस्था करु.

श्री.विष्णु भंगाळे :- मान्य आहे. पण नागरीकांनी करायचे काय ?

श्री.नितीन बरडे :- आता पाऊसाळा सुरु झालेला आहे सभापती साहेब आपल्याकडे जंतुनाशाक औषधी नाही आहे माझ्या मते. मच्छरांचे प्रमाण जास्त होईल. पावसाळयाच्या आधी सार्वजनिक संडाशींना फिनाईल नाही. पाऊसाळयात काय होईल त्याची ही उपाययोजना करा.

श्री.विष्णु भंगाळे :- माझ्या घराच्या पाठीमागे हॉस्पीटल आहे, गटार चोकअप झालेली आहे. मागची गल्ली आमच्या घराची गल्ली कधी कधी हा पाणी रोडावर जातो. याला वारंवार सांगुन सुध्दा आरोग्य विभाग लक्ष देत नाही. त्या प्रभागाच्या आरोग्य निरिक्षकला विचारा मी कितीदा सांगितलेले आहे.

मा.आयुक्त :- या विषय कोणाची तक्रार येण्याची गरज नाही आपण जेव्हा फिरतो तेव्हाच लक्षात यायला पाहिजे.

श्री.नितीन लढढा :- जळगांव शहराची भोईटे शाळा जैन उद्योग समुहाला दिलेली आहे. त्या शाळेतला फार जुन्या काळी माजी आमदार श्री.जयप्रकाश बाविस्कर यांच्या संस्थेला दुध डेअरी व्यवसायच्या कोर्सेससाठी एक मजला भाडयाने दिलेला होता. भाडयाने म्हणजे विनामुल्य दिलेला होता. त्या जागेचा प्रत्येक्ष जाऊन भोळे साहेबांनी ताबा घेतला. ताबा घेतल्यानंतर कायदेशीर नोटीस त्यांना पाठविली. त्यामध्ये भंगार असे सामान की ज्याच मुल्य रु.१०००/- किंवा रु.५००/- होणार नाही असा त्यांच काही भंगार तेथे पडलेल आहे. जैन उद्योगाने शाळा भाडयाने घेतल्यामुळे भाड ही त्यांना सुरु आहे. शाळेची संपुर्ण नुतनीकरणाची Process सुरु आहे. त्या भंगार सामानाचा ताबा घेणे, संबंधीत व्यक्ती वकीला मार्फत महानगरपालिकेला नोटीसी देतात.मी भोळे साहेबांना सांगितले की आपण आयुक्तांची मान्यता घ्या. त्या सामानाचा जाऊन पंचनामा करा आपल्या स्टोअरला टाकुन द्या त्यांना नोटीस द्या की तुमचा हे भंगार सामान आम्ही जप्त केलेले आहे तीन दिवसाच्या आत येऊन तुम्ही घेऊन जा. आणि नका घेऊन जाणार असाल तर नंतर त्याची जबाबदारी म.न.पा.ची राहणार नाही. या अनुषंगाने ज्या शाळेचे नुतनीकरण सुरु आहे

तर ते नुतनीकरण पुर्ण होईल. आणि या शैक्षणिक वर्षापासुन या शाळेला उपक्रम सुरु करणे सोईचे होईल.एक दुसरी अडचण पण आहे तिथे १० वीचा वर्ग माध्यमिक शाळेत चालतं. ते कसं परंतु ते माझ्या हातात नाही आहे आणि तुमच्याही हातात नाही आहे. १० वी च्या विध्यार्थी संख्या तिथे फक्त ४ आहे आणि तेथे स्टॉफची नेमणुक जी आहे. पगार जिल्हा परिषद देतो परंतु प्रॉप्रटी आपली आहे. त्याला शिफ्ट करण्याच्या अनुषंगाने कारण आपल्याकडे पर्यायी शाळा क्र.०५ आहे.

मा.आयुक्त :- या संदर्भात मी शिक्षण अधिकारींशी बोलतो.

श्री.नितीन बरडे :- साहेब ते ४ विध्यार्थी ही झोपडपट्टीतले आहे आणि बळजबरी घेतलेले आहे.

श्री.नितीन लढढा :- आयुक्त साहेब आपणही आढावा बैठकीला होतात. समांतर रस्त्यांचे अनुषंगाने समांतर रस्त्याचे विषय चाललेला होता. आणि ८ ते १५ दिवसामध्ये समांतर रस्त्यांचा भुमिपुजन होणार अशी भुमिका वृत्तपत्रातुन वाचली. परंतु त्याच सोबत अत्यंत महत्वाची अशी भुमिका होती. समांतर रस्ता दोन फेज मध्ये होणार आहे. मुख्य फेज हे म्हणजे ७ -७ मिटरचा नॅशनल हायवे आहे जो Existing Strip आहे ते रुंद होवुन १५ मिटरची होणार आहे मध्य भागी डिव्हायडर येणार आहे. ज्यावेळेला समांतर रस्ते समितीने भुमिका तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. किशोर राजे निंबाळकर यांचेकडे व्यक्त केली होती. साधारणता या रस्त्यांचे १४१ कोटी रुपये मंजुर झालेले आहे. १४१ कोटी मधुन हा ६९ कोटीचा हा पहिल्या टप्प्याच्या कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण होवुन कार्यादेश दिलेला आहे. परंतु त्यावेळेला नॅशनल हायवे अथॅरीटी च्या सिंग साहेबांशी चर्चा केली असता त्यांना १४१ कोटींचा संपुर्ण कार्यकाळ असतांना तुम्ही हा दोन तुकडयांमध्ये का विभाजन करत आहे. त्यांनी सांगितले की पहिल्या टप्प्यामध्ये जी Land आहे ती Possession आहे. Second टप्प्यात राबविण्याच्या दृष्टीकोनातुन ज्याला आपण समांतर रस्ते घेणार आहोत हे Existing Strip आहे. ७ -७ मिटरची रस्ते रुंद होवुन १५ मिटरची होणार आहे. मध्य भागी डिव्हायडर येणार आहे. आणि दोघी बाजुला ५.५-५.५ मिटरचे समानतर रस्ते Parellal चालतील. परंतु समांतर रस्ते करण्याच्या संदर्भात तेथे काही पाण्याची लाईन आहे तर काही विद्युतची लाईन आहे असे प्रॉब्लेम असते. तर ही जागा Clear Possession नसल्या कारणाने आम्ही ही निविदा प्रक्रिया पहीले करत आहे. ज्या वेळेला दुसऱ्या टप्प्यातली जागा उपलब्ध करुन दिली. आम्ही त्याच दिवशी दुसऱ्या टप्प्यातली निविदा प्रक्रिया राबविणार. त्यावेळेस मा.आमदार राजु मामा भोळे ही होते, एम.एस.ई.बी.चे अधिकारी ही होते. एम.एस.ई.बी.च्या अधिकाऱ्यांनी सांगितले की आमच्याकडे निधीची उपलब्धता नसल्यामुळे आम्ही हे काम करु शकणार नाही. महानगरपालिकेची सुध्दा तिच परिस्थिती असल्याने महानगरपालिकेने सुध्दा तिच भुमिका त्या चर्चेत मांडली. त्याच्यामध्ये तोडगा म्हणुन महावितरणला येणारा खर्च DPDC च्या माध्यमातुन घेण्यात यावा आणि त्या अनुषंगाने मा.आ.राजु मामा यांनी तत्कालीन पालकमंत्री श्री.चंद्रकांतदादा यांना निवेदन देऊन त्या निवेदनावर Approval सुध्दा घेतलं की साधारणत: ३ कोटी रुपये शिफ्टींग करण्यात आले परंतु परवाच्या मिटींगचे तंतोतंत वाचल्यानंतर जिल्हाधिकारी साहेबांनी सांगितले की DPDC चा निधी यात देवु शकत नाही .मला एक सांगा की १४१ कोटी केंद्र शासनाने मंजुर केलेले आहे .६९ कोटी रूपयांच्या कामांची निवीदा झाली आहे.त्या मिटींगच्या ईतिवृत्तामध्ये या ज्या काही गोष्टी आहेत , त्यावेळी मनपाचे जे स्वत: चे जे स्ट्रिट लाईट आहेत ते पोल शिफ्टींग करण्याची जबाबदारी मनपाने स्विकारली होती . पाणी पुरवठयाच्या पाईप लाईन असतील त्याही शिफ्टींग करण्याची तयारी दर्शविली होती .परंतु एम.एस.ई.बी चा महत्वाचा मुददा हा आहे जर हिच परिस्थिती राहील तर मनपा याची जबाबदारी स्विकारेल का ? मनपाने स्विकारली नाही किंवा नियोजन मंडळाने स्विकारली नाही किंवा एम.एस.ई.बी ने स्विकारली नाही तर ५ वर्षांपासुन हा समांतर रस्त्याचा गाडा असा सुरू आहे. आणि या कामाला स्वत: नितीन गडकरी साहेबांनी ४ वर्षापुर्वी या कामाची घोषणा केली होती , परंतु ४०० कोटी रूपयांचा प्रकल्प वेगवेगळया अडचणीमुळे त्यामध्ये सगळयागोष्ठी समाविष्ट होत्या ४०० कोटी पासुन तो प्रकल्प हळुहळु करत १४१ कोटी पर्यंत आला परंतु आज ६९ कोटी रूपयांची निविदा निघालेली असुन यामध्ये एम.एस.ई.बी ने दुर्लक्ष केले , महापालिकेने , नियोजन मंडळाने दुर्लक्ष केले तर तो ६९ कोटी रूपयांपर्यंतच सिमीत राहील . जळगांव शहरातील नागरीकांची मुख्य जी मागणी आहे ती समांतर रस्त्याची आहे हा जो भाग आहे हा चौपदरीकरणाचा आहे , समांतर रस्त्याची मागणी मा. आमदार गिरीष भाऊ महाजन आणि तत्कालीन जिल्हाधिकारी किशोर राजे निंबाळकर तसेच जळगांव समांतर रस्ते कृती समिती यांनी जवळपास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण केले होते आणि मा.गिरीषभाऊंनी उपोषणकर्त्यांशी चर्चा करून ते उपोषण सोडलेले होते की तुमच्या पुर्ण मागण्या मान्य करून पुढील कामास तातडीने सुरूवात होईल. आणि ती झाली एक टप्पा आता पुर्णत्वास आहे परंतु मुख्य मागणी जी होती समांतर रस्त्याची ती या निष्काळजी पणाने बाजुला पडली किंवा कोणी जबाबदारी स्विकारत नसेल तर जळगांव शहरातील समांतर रस्त्याची मागणी जी आहे ती कायम राहील तर मी आपणांस , मा.गिरीषभाऊ तसेच मा.आमदार

श्री.राजुमामांनासुध्दा विनंती करेल . आपण आपल्या निधीचे नियोजन जो पावेतो करीत नाही काही निर्णय जर होत नसेल तर काही अंशी तो घेणे गरजेचे आहे. एम.एस.ई.बी ठाम राहील , नियोजन मंडळ ठाम राहील परंतु शहरातील वाहतुकीची जबाबदारी आपली सुध्दा पर्यायाने आपली सुध्दा तेवढीच आहे हा विषय अत्यंत गंभीर आहे मा. सभापती आपण सुध्दा मा.गिरीषभाऊंना विनंती करावी. मा.राजुमामांना या संदर्भात विनंती करावी. आम्ही सुध्दा विनंती करू आणि जळगांव शहराचा हा प्रश्न मार्गी लावणे गरजेचे आहे.

मा.सभापती :- सर्व अधिकारी, कर्मचारी व सर्व सदस्य यांना विनंती आहे की , या वाढत्या तापमानाच्या संदर्भात मी स्वत: एक पुढाकार घेतलेला आहे की वृक्ष लागवडीच्या संदर्भात सर्व अधिकारी, कर्मचारी व सर्व सदस्य या सर्वांनी ज्याच्या त्याच्या लेव्हलवर जेथे शक्य होईल किंवा काही मदत करता येईल . किंवा आपण जे वृक्ष मागवितो तर त्यापेक्षा आपण जर मोठे वृक्ष मागविले तर बरे होईल त्याअनुषंगांने वृक्ष लागवडीचे महाअभियान राबवायचे आहे , जर आपण एम.आय.डी.सी मधील एखाद्या कंपनीस सांगीतले की आम्हाला ट्री गार्ड प्रोव्हाईड करा त्या ट्री गार्ड ला आपण आपल्याच कंपनीचे नांव द्या व मदत करा असे याबाबतीत मी काही डॉक्टरांना सुध्दा भेटलो आपण आपल्यापरीने जी मदत होईल ती करा तसेच श्री. योगेश वाणी आहेत यांच्याशी याबाबतीत संपर्क करावा . आपण २५ हजार वृक्ष उपलब्ध होणार आहेत व आपण लागवड करणार आहोत .

श्री.विष्णु भंगाळे :- आपल्या भावना खुप चांगल्या आहेत. मागील ५ तारखेला प्रशासन आणि रोटरी परिवार यांनी संयुक्त पणे वृक्ष लागवडीचा उपक्रम राबविला तेथे मा.आयुक्त साहेब सुध्दा उपस्थित होते , मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की रोटरी परिवार आणि आपण जो कोणी सहभाग घेत असेल प्रत्येक प्रभागातील नगरसेवक जेजे जितके लावु शकता परंतू एक दिवस सर्व अधिकारी आणि मनपाचे नगरसेवक जर कुभारखेडयाचा एक भाग ५ ते ६ एकर चा भाग आपण तेथे जर वृक्षारोपण केले तर आपल्या जळगांव शहराच्या पुढील काळासाठी योग्य राहील , काही ठिकाणी आपण वृक्षारोपण करतो परंतु ते जगविली जात नाही . मी प्रशासनाला विनंती करतो की रोटरी परिवाराच्या सहायोगाने आपण सर्व मिळुन हे करू , परंतु तेथे पाण्याचा प्रॉब्लेम फार मोठा आहे मागे आपण त्याठिकाणी पाण्याची टाकी आणुन ठेवलेली होती , त्या एरीयातील काही मुले ती उचलुन घेवुन गेले आहेत समोरील काही रहिवासी परिचीत असल्याने त्यांनी फोन केला की असे घडत आहे का तर ते हो म्हणाले तर नंतर ते पाण्याची टाकी परत त्याठिकाणी ठेवुन गेले .आपण जी वृक्ष लागवड करू त्याकरीता आपल्याकडुन त्याठिकाणी पाण्याची व्यवस्था करता येईल का ? हा संकल्प पुर्ण होईल . त्याठिकाणी वृक्ष लागवड करतांना जळगांव शहरातील मोठे मोठे नामांकीत व्यक्ती त्या ठिकाणी होते व स्वत: त्यांनी प्रत्येक वृक्ष लागवडीकरीता खडडे केले होते .

मा.आयुक्त :- बघुया , कारण कसे आहे , काही व्हिजीबीलीटी पाहाव्या लागतात .आपण बघु काय करता येईल. यासंदर्भात मला एक सांगायचे आहे की उद्या आपल्या कडे वटपौर्णिमा असते आणि दरवेळेला वडाची पुजा केली जाते. तर प्रत्येक वार्डात जे महिला नगरसेविका आहे त्यांच्या हस्ते एक वडाचे झाड लावण्याचा उपक्रम राबवावा.

सौ.उज्वला बेंडाळे :- आता झाडे लावण्या संदर्भात नागरीकांना जे आव्हान दिले जात आहे तर महानगरपालिकेच्या ड्रेनेज सिस्टीम मुळे काही अडचण होणार आहे का ?

मा.आयुक्त :- भोळे साहेबांनी १४७ ठिकाणी निश्चित केलेली आहे तुम्हाला तिथे सर्व सुविधा मिळेल फक्त तुम्हाला लक्ष देवुन सहकार्य केले पाहीजे.

श्री.नितीन बरडे :- जे ५-१० हजार झाडे आपण लावतात ते जगायला फार अडचण येते. आम्ही पिंजरा देणार, आम्ही झाडे लावणार, जगवणे ही आमचे काम, तुमच्याकडुन काय मदत मिळेल.

मा.आयुक्त :- माझेकडुन काय अपेक्षा आहे?

श्री.नितीन बरडे :- खड्डा खोदुन देणे आणि काळी माती मागुन देणे.

मा.आयुक्त :- २५ हजार खड्डयांचे नियोजन केलेले आहे.

श्री.विष्णु भंगाळे :- प्रत्येक वार्डात प्रत्येक इंजिनिअराचा नियोजन झालेले आहे.

श्री.नितीन लढढा :- मेहरुण तलाव रस्त्यावर खुप वाहतुक राहते. परंतु तेथे चौपाटी ला अट्याच होण्याच्या अनुषंगाने रस्ता केलेला आहे. तर तातडीने तिथे बॅरागेटींग लावणे गरजेचे आहे.

श्री.सदाशिव ढेकळे:- संपुर्ण महाराष्ट्रात आपल्या इमारती सारखी इमारत नाही परंतु Entry ला दुर्गंधी येते ती दुर झाली पाहिजे.

श्री.सुनिल भोळे :- तेथे लघवीचे पाणी जमा होते, आणि जे Verticle पाईप आलेले आहे वरतुन ते सर्व पाईप खराब झालेले आहे सडलेले आहे. त्याचा खुप मोठा खर्च आहे. इस्टीमेट तयार केलेले आहे.

मा.सभापती :- पुढच्या सभेपर्यंत करा ते सर्व क्लीयर.

श्री.सदाशिव **ढेकळे** :- काम होईल का ?

मा.आयुक्त :- त्याचे पैसे किती लागणार इस्टीमेट **कितीचे** ते झाल्यानंतर काम निश्चित होईल. तुम्ही चांगला कॉन्ट्रक्टर सुचवा आपण काम करु.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ९४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, म.न.पा. आरोग्य विभागाकडील वाहन क्र.एम एच १९ एम ९२०० (मैला व्हॅक्युम) हे वाहन नागरीकांच्या मुलभुत सुविधेकरीता अत्यावश्यक सेवेतील आहे. महानगरपालिकेकडे सद्यास्थितीत एकमेव मैला व्हॅक्युमचे वाहन आहे. सदर वाहन बंद झाल्यास शहरातील नागरीकांची गैरसोय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर वाहनाचे ग्रीन बांगडी हौस पाईप-३० मिटर व मेल फिमेल कप्लींग - ३ सेट खरेदी करणे गरजेचे असल्याने अधिकृत वितरक व मॅनीफॅक्चर असलेले मे.आवटे फॅब्रीकेटर्स अण्ड ऑटोमोबाईल्स वर्क्स, पुणे यांचेकडील कोटेशन नं.५४, दि.०८/०२/२०१९ अन्वये दुरुस्ती खर्च रक्कम रु.६२,४१०/- मात्रच्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १५ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**अनुमोदक :- पाटील प्रतिभा सुधिर**

**नगरसचिव:- विषय क्र. ५)** नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र.१५ मेहरुण गावबुरुज जवळील नाल्यावर पुल बांधणे कामी मक्तेदार डी.एच.पाटील कन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेवर ५% जास्तीचे दरास रक्कम रु.३१४२६५६/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ९५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरीदलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत वार्ड क्र.१५ मेहरुण गावबुरुज जवळील नाल्यावर पुल बांधणे कामास मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्र.नप/नियोजन/आर.आर./२०४/१८ दि.१५/१०/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार म.आयुक्त मनपा यांचे दि.२९/११/२०१८ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्र.११७२ सन २०१८-१९ मनपाच्या संकेत स्थळ www.jcmc.gov.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्र.साबा.८५९ दि.०४/१२/२०१८ चे पत्रान्वये दै.दिव्यमराठी या वर्तमान पत्रात दि.०५/१२/२०१८ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगाका व्दारे निविदा फार्म डाऊनलोड करण्याकरीता दि.०४/१२/२०१८ ते दि.१७/१२/२०१८ पर्यंत मुदत देण्यात आली. मुदतीत संगणकाव्दारे E- Tender Portal www.maharashta.etender.in, Sub Portal www.jcmcmaharashtra.etenders.in वर दि.१८/१२/२०१८ रोजी रात्री ११.०० वाजेपर्यंत दिलेल्या मुदतीत दि.१८/१२/२०१८ पर्यंत ०३ ई निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. तसा रिपोर्ट Einternet वरुन दि.१९/१२/२०१८ रोजी घेण्यात आला. तसेच दि.२०/१२/२०१९ रोजी घेण्यात आलेल्या रिपोर्टानुसार ०३ ई-निविदा आल्याचे नमुद आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांचे फोल्डरक्र.१ शहर अभियंता यांचे समक्ष उघडले असता उक्त कामांचे ०३ मक्तेदाराचे प्राप्त झालेले ई-निविदा कागदपत्रांची छाननी करुन उक्त कामाचे ई-निविदा दराबाबतचे फोल्डर नं.२ दि.०१/०१/२०१९ रोजी ओपन करुन उक्त मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्त्याची संगणकावर प्रिंन्ट प्रत काढुन घेण्यात आली असुन उक्त तुलनात्मक तक्त्यांची प्रत मुळ प्रकरणास जोडलेली असुन त्यानुसार ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| निविदा धारकाचे नांव | डि.एच.पाटील कन्स्ट्रक्शन प्रो.पा.विशाल दगडु पाटील | मे.चतुर्भुज कन्स्ट्रक्शन | वैष्णवी कन्स्ट्रक्शन प्रो.पा.मनोहर धर्मा चौधरी |
|---|---|---|---|
| निविदा रक्कम रु.२९९३००६/- | निविदा रक्कमेवर ८% जास्तचे दराने | निविदा रक्कमेवर ११% जास्तचे दराने | निविदा रक्कमेवर ९% जास्तचे दराने |
| | **३२३२४४६/-** | **३३२२२३७/-** | **३२६२३७७/-** |

मक्तेदार डि.एच.पाटील कंस्ट्रक्शन यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा ८% जास्तचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.३२३२४४६/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम रु.२९,९३,००६/- मात्र नागरीदलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गतच्या निधीतुन व रक्कम रु.२,३९,४४०/- मात्र मनपा निधीतुन खर्च करावयाचा आहे. त्यानुसार मक्तेदार डि.एच.पाटील कन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेपेक्षा ८% जास्तचे दर आले सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता सा.बा.पत्र क्र.९५२/२०१८-१९ दि.०८/०१/२०१९ अन्वये दराबाबत दि.०९/०१/२०१९ दु. ०४.०० वा. बोलविले असता मक्तेदार यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीकरिता न येता त्यांनी दि.०९/०१/२०१९ रोजी सा.बा.आ.क्र./२९९० दि.०९/०१/२०१९ अन्वये सदरचे काम निविदा रक्कमेवर ५% जास्तीचे दरात करण्याची लेखी संमती दिली आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.३१४२६५६/- मात्र अपेक्षीत खर्च आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम रु.२९,९३,००६/- मात्र नागरीदलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गतच्या निधीतुन व रक्कम रु.१,४९,६५०/- मात्र मनपा निधीतुन खर्च करावयाचा आहे. वाटाघाटी अंती दिलेल्या दराशी निविदा रक्कमे बरोबर तुलना केली असता सुमारे ८% दरात वाढ झालेली आहे तसेच सदर कामाचे अंदाजपत्रक सन २०१६-१७ चे DSR नुसार आहे. त्यात GST कराची रक्कमेची तरतुद करण्यात आलेली नाही त्यामुळे सदर निविदा रक्कमेत GST ची रक्कम गृहीत धरुन सदर अंदाजपत्रकात एकुण रक्कमेत २१.३४% जास्तीने वाढ झालेली असल्याने मक्तेदार डी.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे वाटाघाटी अंती ५% सर्वात कमीचे असल्याने दर स्विकृत करुन रक्कम रु.३१४२६५६/- मात्रच्या प्रस्तावास महाराष्ट्र अधिनियम १९४९ प्रकरण ७ कलम ७३(क) अन्वये मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १५ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- सोनवणे सुरेश माणिक**
**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव:- विषय क्र. ६)** महानगरपालिका आरोग्य विभागाकडील वाहने अनुक्रमे १) एम.एच.१९ एम ०८५४ २) एम.एच.१९ एम ०८५२ (फ्रंट एन्ड लोडर) या वाहनांकरिता नविन सिलेंडर खरेदी करणे कामी रक्कम रु.६३७२०/- मात्र खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ९६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, वाहन चालक आरोग्य विभागाकडील मागणी प्रमाणे दि.१८/०२/२०१९ रोजी एम एच १९ एम ०८५४ (फ्रंट एन्ड लोडर) ची प्रत्यक्ष पाहणी केली असता फ्रंट लोडरच्या लोडरचा मेन सिलेंडरच्या खाली कोणतीतरी जड वस्तु ठेवल्याकारणाने सिलेंडर RH & LH IN OUT Side ने बेंड झालेला आहे. तसेच (Cubic Capacity) पेक्षा जास्त वजनाचे रॉ मटेरियल / कचरा /गटारगाळ उचल्याकारणामुळे फ्रंट लोडरचा मेन सिलेंडर RH & LH IN OUT Side ने बेंड झालेला आहे.

फ्रंट लोडर १)एम एच १९ एम ०८५२, २)एम एच एम ०८५४ ला नविन सिलेंडर टाकणेकामी Essey Engineering Company, Nashik यांच्या Qtn-९९/१८-१९ दि.२२/०२/२०१९ अन्वये प्रति सिलेंडर रक्कम रु.१३,५०० x ४ = ५४,०००+GST १८% प्रमाणे रक्कम रु.९,७२०/- असे एकुण रक्कम रु.६३,७२०/- मात्रच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५(२)(२) अन्वये मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १५ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- कापसे मयुर चंद्रकांत**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिवः- विषय क्र. ७)** महाराष्ट्र प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.०३/०९/२०१८ ते दि.०७/०९/२०१८ व दि.१०/०९/२०१८ ते दि.१५/०९/२०१८ अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ९७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की ,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.०३/०९/२०१८ ते दि.०७/०९/२०१८ व दि.१०/०९/२०१८ ते दि.१५/०९/२०१८ अखेर संपणाऱ्या लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेतली .

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १५ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- सोनवणे सुरेश माणिक**

**नगरसचिवः- विषय क्र. ८)** जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.३१/१२/२०१८ ते दि.०६/०१/२०१९, दि.०७/०१/२०१९ ते दि.१३/०१/२०१९, दि.१४/०१/२०१९ ते दि.२०/०१/२०१९, दि.२१/०१/२०१९ ते दि.२७/०१/२०१९ व दि.२८/०१/२०१९ ते दि.०३/०२/२०१९ या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ९८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की ,जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.३१/१२/२०१८ ते दि.०६/०१/२०१९, दि.०७/०१/२०१९ ते दि.१३/०१/२०१९, दि.१४/०१/२०१९ ते दि.२०/०१/२०१९, दि.२१/०१/२०१९ ते दि.२७/०१/२०१९ व दि.२८/०१/२०१९ ते दि.०३/०२/२०१९ या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेतली .

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १५ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- कापसे मयुर चंद्रकांत**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिवः- विषय क्र. ९)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ९९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेण्यात येत आहे.

१) प्रशासकीय आदेश क्रं./१३१/दि.०४/०२/२०१९ अन्वये जळगांव शहरात विविध ठिकाणी अग्निशमन विभागाकडील फायर फायटर टँकर भरणेसाठी पाण्याची व्यवस्थे करिता बोअरवेल करणे व त्यावर विजपंप पुरविणे व बसविणे कामी मक्तेदार अथांग प्रशांत पारख,जळगांव यांचे अंदाजित रक्कमेवर २% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.५,८८,१४०/- मात्र खर्चाची संविंदा.

२) प्रशासकीय आदेश क्रं./१३५/दि.१२/०२/२०१९ अन्वये जळगांव शहरातील पीव्हीसी पाईप लाईन दुरुस्ती कामी PVC पाईप खरेदी करणे कामी मक्तेदार संजय दिनेश भोळे,जळगांव यांचे निविदा रक्कमेपेक्षा ४% जास्तीचे दर स्विकारुन रक्कम रु.७,२८,६८६/- मात्र खर्चाची संविंदा.

३) प्रशासकीय आदेश क्रं./१३६/दि.१२/०२/२०१९ अन्वये जळगांव शहर महानगरपालिकेतील पाणी पुरवठा युनिट कार्यालयातील पाईप लाईन दुरुस्ती कामी साहित्य खरेदी करणे कामी मक्तेदार संजय दिनेश भोळे,जळगांव यांचे निविदा रक्कमेपेक्षा ४.९८% जास्तीचे दर स्विकारुन रक्कम रु.६,३७,९१३/- मात्र खर्चाची संविंदा.

४) प्रशासकीय आदेश क्रं./११९/दि.११/०२/२०१९ अन्वये जळगांव शहरातील डांबरी रस्ते दुरुस्ती कामी खडी (Crushed Matal) पुरविणे कामी मक्तेदार मोहित स्टोन क्रशिंग यांचे वाटाघाटी अंती चे अंदाजित रक्कमेचे दर स्विकारुन रक्कम रु.२४,९७,६६७/- मात्र खर्चाची संविंदा.

५) प्रशासकीय आदेश क्रं./१२१/दि.१३/०२/२०१९ अन्वये सुभाष चौक ते पांडे डेअरी चौक व भागातील अतिक्रमण काढलेल्या रस्त्यावरच्या साईडपटयाचे सरफेस डेसींग करणे कामी मक्तेदार सुशिलकुमार गणपत डोंगरे,जळगांव यांचे वाटाघाटी अंती चे अंदाजित रक्कमेचे दर स्विकारुन रक्कम रु.२२,६९,३९७/- मात्र खर्चाची संविंदा.

६) प्रशासकीय आदेश क्रं./१२२/दि.१३/०२/२०१९ अन्वये हॉटेल मोराक्को ते घाणेकर चौका पर्यंत अतिक्रमण काढलेल्या रस्त्यावरच्या साईडपटयाचे सरफेस डेसींग करणे कामी मक्तेदार सुशिलकुमार गणपत डोंगरे,जळगांव यांचे वाटाघाटी अंती चे अंदाजित रक्कमेचे दर स्विकारुन रक्कम रु.२२,२०,९२३/- मात्र खर्चाची संविंदा.

७) प्रशासकीय आदेश क्रं./१४३/ दि.०२/०३/२०१९ अन्वये १४ व्या वित्त आयोगाच्या शहरातील स्वच्छ भारत अंतर्गत मनपा आरोग्य विभागाकडील सार्व.शौचालया ठिकाणी पाण्याची व्यवस्थे करिता ठिक-ठिकाणी बोअरवेल करुन त्यावर सबमर्सिबल विज पंप पुरविणे व बसविणे कामी मक्तेदार मे.डि.एच.पाटील कन्स्ट्रक्शन, जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच दर स्विकारुन रक्कम रु.१४,७८,५७५/- मात्र खर्चाची संविंदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १५ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- सोनवणे सुरेश माणिक**
**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

राष्ट्रगीता नंतर येणे प्रमाणे सभेचे कामकाज संपन्न झाले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**